प्रेस नोट

दिनांक :- १८/०७/२०२५

१)आलोसे श्री.संतोष भगवानराव क्षीरसागर, वय ५३ वर्ष, पद- उप-अभियंता, नेमणुक -जिल्हा परिषद बांधकाम उपविभाग आर्णि, रा.मुळ पत्ता-घर क.५० फरांदे नगर नांदेड (वर्ग-१),अधिक २यांना लाच स्विकारतांना लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यवतमाळ, यांनी रंगेहाथ पकडलेबाबत...

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | यवतमाळ युनिट |
| पो.स्टे व गुन्हा नोंद क्रमांक व कलम | पो.स्टे. आर्णि जिल्हा-यवतमाळ, अप.क्र. ५६०/२०२५<br>कलम ७,७A,१२ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ |
| लोकसेवकाचे नांव व कार्यालय | **१)आलोसे** श्री.संतोष भगवानराव क्षीरसागर, वय ५३ वर्ष, पद- उप-अभियंता, नेमणुक -जिल्हा परिषद बांधकाम उपविभाग आर्णि, रा.मुळ पत्ता-घर क.५० फरांदे नगर नांदेड (वर्ग-१),२)श्री. सुरडकर, रा. आर्णि ता.आर्णि जि.यवतमाळ सेवानिवृत्त कर्मचारी जि.प. बांधकाम विभाग (खाजगी व्यक्ती) ३)सागर शंकरराव भारती वय २७ वर्ष व्यवसाय,चालक रा.चिंतामणी कॉलनी वार्ड क्र. ५ पंचधारा रोड पुलगांव ता.देवळी जि.वर्धा (खाजगी व्यक्ती) |
| मागितलेली लाचेची रक्कम | २०,०००/- रूपये |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | १०,०००/- रूपये |
| थोडक्यात हकिकत | यातील तक्रारदार हे सरपंच या पदावर कार्यरत असुन त्यांचे गावामध्ये शासानाचा जिल्हा वार्षिक योजनेतुन जनसुविथेकरिता स्मशानभुमीच्या सुशोभिकरणाचे काम करण्याकरिता प्रशासकिय मंजुरी देण्यात आली व त्या कामाकरिता १० लाख रु प्रस्तावित करण्यात आले होते.सदर काम दि.०७/०७/२५ रोजी पुर्ण झाल्याने कामाचे देयक तयार करुन पुढील बिल मंजुरी करिता आलोसे क्र.१ यांना सादर केले असता सदर कामाची मंजुर रक्कम १० लाख रु असुन त्याच्या २ टक्के प्रमाणे २०००० रु मला कॅशमध्ये दया, त्यांनतर मी तुमचे बील आवक करुन त्यावर सही करेन.त्याकरिता त्यांनी तक्रारदार यांना आरोपी क्र.२ यांना भेटण्यास सांगत असुन आलोसे क्र.२ हे. लाचेची मागणी करित आहेत.अशा स्वरुपाची तक्रार दि.१४/०७/२०२५ रोजी प्राप्त झाली होती.त्याची पडताळणी दि.१५/०७/२०२५ केली असता सेवानिवृत्त झालेले आरोपी क्र.२ याचे मार्फत तडजोडीअंती एक टक्का प्रमाणे १०००० रु लाचेची मागणी केली. आज त्याची दि.१६/०७/२०२५ रोजी सापळा कार्यवाही दरम्यान त्यांचे कार्यालयात आलोसे क्र. २ सुरडकर हे उपस्थित नसल्याने, तक्रारदार हे आलोसे क्र.१ यांना भेटले असता आलोसे क्र.१ यांनी त्यांचे समक्ष हजर असलेला त्यांचा वाहन चालक आलोसे क्र.३ यांचेकडे लाच रक्कम देण्याबाबत तक्रारदार यास सांगितले त्यावरुन तक्रारदार यांनी आरोपी क्र.३ यास आरोपी क्र.१ याचे समक्ष लाच रक्कम दिली असता त्यांनी ती स्विकारली.त्यांना लाचेच्या रकमेसह ताब्यात घेवुन, तक्रारदार यांची तक्रार नोंदवुन गुन्हयाचे तपासकामी अटक करण्यात आली आहे. गुन्हयाची पडताळणी व सापळा यांची माहीती मा.वरिष्ठांना फोनद्वारे कळविलेली असुन त्यांनी केलेल्या मार्गदर्शनाप्रमाणे पुढील तपास करित आहोत. |

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,यवतमाळ तर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणा-या लोकसेवका बद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, यवतमाळ येथे संपर्क करावा.

---

संपर्क पत्ता :- लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, यवतमाळ, दगडी इमारत, टांगा चौक यवतमाळ
संकेत स्थळ :- कलेचंबइलंअजउंस/डींचवसपबमण्हवअण्पद
टोल फ्री कमांक :- १०६४ दुरध्वनी क्रमांक :- ०७२३२- २४४००२

श्री. अभय आष्टेकर, पोलीस उपअधीक्षक, ला.प्र.वि. यवतमाळ मो.नं. ८२७५०८८७९७
श्री.अर्जुन घनवट,पोलीस निरीक्षक ,ला.प्र.वि.यवतमाळ.मो.नं.९६२३१०१७०६
श्री.मनोज ओरके ,पोलीस निरीक्षक, ला.प्र.वि.यवतमाळ.मो.नं.८८५५०८०००७

(मनोज ओरके)
पोलीस निरीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, यवतमाळ